| | |
|---|---|
| MHST080012592022 | दाखल दिनांक – ०१.१२.२०२२<br>नोंदणी दिनांक – ०१.१२.२०२२<br>निकाल दिनांक – २२.०४.२०२५<br>कालावधी –०२ वर्षे ०४ महिने २१ दिवस |

**मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खंडाळा, ता. खंडाळा, जि. सातारा**
**यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी – श्रीमती क. अ. पट्टेबहादूर)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५०२/२०२२**
**निशाणी क्र.१७**

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन,<br>शिरवळ पोलीस स्टेशन, गु.र.नं.२४५/२०२२ |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | श्रीमती के. बी. तपासे. |
| आरोपी | हिदायतुल्ला महमुद इनामदार,<br>वयः ५० वर्षे, व्यवसायः मजुरी,<br>राहणारः न्यु कॉलनी, शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री. आय. डी. खान. |

**भाग –ब**

| | |
|---|---|
| अपराध घडला दिनांक | १८.११.२०२२ |
| पहिली खबर दिनांक | १८.११.२०२२ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | ०१.१२.२०२२ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०२.०१.२०२५ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २२.०४.२०२५ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | २२.०४.२०२५ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २२.०४.२०२५ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

## आरोपीचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी. आर. पी. सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | हिदायतुल्ला महमुद इनामदार | दिनांक १८.११. २०२२ रोजी फौ.प्र.सं.कलम ४१(१)(अ) अन्वये नोटीस | कॅश सिक्युरिटी दिनांक ०१.१२. २०२२ | मुंबई जुगार प्रतिबंध कायदा कलम १२(अ) | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |

## भाग – क

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी/बचाव/न्यायालयाचे साक्षीदार

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | जितेंद्र सुदामराव शिंदे | तपासी अंमलदार | ११ |

आरोपीतर्फे तोंडी पुरावा देण्यात आलेला नाही.

**अभियोगपक्षाचे/बचाव/कोर्ट निशाणी**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | १२ | जप्ती पंचनामा |
| २. | १३ | फिर्याद |
| ३. | १४ | छापील फिर्याद |
| ४. | १५ | मुद्देमाल पावती |

आरोपीतर्फे लेखी पुरावा देण्यात आलेला नाही.

**ड. मुद्देमाल**

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | -- | एक पांढरे रंगाचे स्लिपबुक |
| २. | -- | एक हिरवे रंगाचा बॉलपेन |
| २. | -- | रोख रक्कम रुपये १२१०/- |

**न्यायनिर्णय**
**(घोषित दिनांक २२ एप्रिल, २०२५)**

आरोपीवर मुंबई जुगार प्रतिबंध कायदा कलम १२(अ) अन्वये दोषारोप ठेवण्यात आलेला आहे.

**अभियोगपक्षाची हकिगत थोडक्यात खालील प्रमाणे** –

**२.** फिर्यादी प्रशांत वामन वाघमारे हे शिरवळ पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होते. दिनांक १८.११.२०२२ रोजी पोलीस निरीक्षक श्री. मदने यांना खबर मिळाली की, शिरवळ शहरात शिवाजी चौक ते सटवाई कॉलनी जाणारे रोडलगत मांडचा ओढयाचे काठाला आरोपी लोकांकडून पैसे घेवून कल्याण मटका नावाचा जुगार चालवत आहे. त्यानुसार, त्यांनी सदर ठिकाणी कारवाईचे आदेश दिले. त्यानंतर, पोलीस हवालदार श्री. शिंदे यांनी दोन पंचांना बोलावून घेतले

व त्यांना बातमीचा आशय समजावून सांगितला. त्यानंतर, त्यांनी सायंकाळी १७.०० वाजताचे सुमारास इतर पोलीस कर्मचारी व दोन पंचासह खाजगी मोटार सायकलने घटनास्थळी छापा टाकला. घटनास्थळी आरोपी त्याच्या हातातील स्लिप बुकवर समोर असलेल्या इसमाला विचारुन काहीतरी लिहीत असताना मिळून आला. त्यांची चाहूल लागताच लिहून घेत असलेला इसम पळून जाण्याच्या तयारीत असताना त्यांनी त्याला जागीच पकडले. त्यांनी त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव हिदायतुल्ला महामुद इनामदार असे सांगितले. तसेच, तो कल्याण मटका नावाचा जुगार घेत असल्याचे त्याने सांगितले. त्याच्या अंगझडतीमध्ये एक पांढरे रंगाचे स्लिपबुक, एक हिरवे रंगाचा बॉलपेन तसेच रोख रक्कम रुपये १२१०/– असा मुद्देमाल मिळून आला. सदर मुद्देमाल पोलीस हवालदार श्री. शिंदे यांनी दोन पंचांसमक्ष जागीच पंचनामा करुन जप्त केला. त्यानंतर, त्यांनी निशाणी क्र.१३ अन्वये आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली.

३. त्यानंतर, शिरवळ पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नं.२४५/२०२२, मुंबई जुगार प्रतिबंध कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपासी अधिकारी पोलीस हवालदार श्री. जे. एस. शिंदे यांनी साक्षीदारांचे बयान त्याच्या सांगण्याप्रमाणे घेतले. तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

४. माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपीविरुध्द निशाणी क्र.९ वर दोषारोप निश्चित केले. त्यातील माहिती त्यांना मराठी भाषेत समजावून सांगितली. ती त्यांना समजल्यानंतर त्यांची जबानी नोंदविण्यात आली. आरोपीने त्याच्याविरुध्द निश्चित केलेले दोषारोप नाकारले व संपरिक्षेची मागणी केली.

५. आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ [फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब)] अन्वयेचे निवेदन निशाणी क्र.१६ येथे नोंदविण्यात आले.

६. अभियोग पक्षाकरीता सरकारी अभियोक्ता श्रीमती के. बी. तपासे व आरोपीतर्फे वकील श्री. आय. डी. खान यांचा युक्तिवाद ऐकला.

७. अभियोग पक्षाच्या कथेवरुन माझ्यासमोर खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले व त्यावर मी पुढीलप्रमाणे कारणांसहीत निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, दिनांक १८.११.२०२२ रोजी सायंकाळी १७.०० वाजताचे सुमारास शिरवळ शहरात शिवाजी चौक ते सटवाई कॉलनी जाणारे रोडलगत मांडचा ओढयाचे काठाला आरोपी हा बेकायदा, बिगर परवाना स्वतःचे आर्थिक फायद्याकरिता कल्याण मटका नावाचा जुगार चालवत असताना मिळून आला व त्यायोगे त्याने मुंबई जुगार प्रतिबंध कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे का ? | नकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ करीताः**

८. आरोपीविरुद्धचा दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने तपासी अंमलदार (अ.सा.क्र.१) यांची साक्ष अभिलेखावर नोंदवली. त्यांच्या सरतपासात असे आले आहे की, दिनांक १८.११.२०२२ रोजी ते शिरवळ पोलीस स्टेशन येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होते. सदर दिवशी मा. पोलीस निरीक्षक मदने यांना बातमी मिळाली की, आरोपी हा कल्याण मटका नावाचा जुगार चालवत आहे. त्यांनी

त्यांना कारवाईचे आदेश दिले. त्यानंतर, त्यांनी दोन पंचाना बोलावून घेतले व घटनास्थळी शिवाजी चौक ते सटवाई कॉलनी येथे मांड ओढयाजवळ सुमारे १७.०० वाजता छापा टाकला. तेथे आरोपी एक स्लिप बुक, एक पेन व रोख रकमेसह मिळून आला. आरोपीच्या ताब्यात मिळून आलेल्या स्लिप बुकवर वेगवेगळे आकडे लिहीलेले होते. त्यांनी आरोपीकडे विचारणा केली असता आरोपीने त्यांना कल्याण नावाचा मटका घेत असल्याबाबत सांगितले. त्यांनी आरोपीला परवान्याबाबत विचारणा केली असता आरोपीने त्याच्याकडे तसा परवाना नसल्याचे सांगितले. आरोपीच्या ताब्यात एक स्लिप बुक, एक बॉलपेन, रोख रक्कम १२१०/– मिळून आली. सदर मुद्देमाल त्यांनी दोन पंचासमक्ष जप्त केला व त्याचा निशाणी क्र.१२ अन्वये पंचनामा केला. त्यानंतर, प्रशांत वाघमारे यांनी आरोपीविरुध्द निशाणी क्र.१३ अन्वये तक्रार दाखल केली. त्यानंतर, त्यांनी निशाणी क्र.१५ अन्वयेची मुद्देमाल पावती फाडली. त्यांच्या उलटतपासात असे आले आहे की, मुंबई जुगार व कल्याण मटका कशाप्रकारे खेळला जातो हे त्यांना माहिती नाही. घटनास्थळ हा रहदारीचा रस्ता आहे. घटनास्थळी गिऱ्हाईक सापडले नाही. रहदारीने जाणाऱ्या–येणाऱ्या लोकांची त्यांनी साक्ष नोंदवली नाही. घटनास्थळी बोगस गिऱ्हाईक पाठवले नाही. त्यांना उलटतपासात विचारण्यात आलेल्या इतर प्रश्नांची उत्तरे त्यांनी नाकारली.

९. अभियोग पक्षाचा एकंदरीत पुरावा पाहता त्यांनी एकही ठोस पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. इतर साक्षीदारांना साक्षी समन्सची बजावणी होऊन त्यांनी न्यायालयात हजर होऊन आपली साक्ष पटलावर नोंदविलेली नाही तपासी अंमलदार (अ.सा.क्र.१) हे पोलीस साक्षीदार आहेत. केवळ त्यांच्या साक्षीवर विसंबून राहून आरोपीस दोषी ठरविणे न्यायोचित ठरणार नाही. आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी कोणताही संयुक्तिक पुरावा अभियोगपक्ष अभिलेखावर आणण्यास असमर्थ ठरला आहे. आरोपीचा गुन्ह्यातील सहभाग दर्शविण्याकरीता स्वतंत्र साक्षीदारांचा सबळ पुरावा अभिलेखावर प्राप्त नाही. म्हणून, मी या निष्कर्षाप्रत

पोहोचते की, आरोपी हा घटनास्थळी बेकायदा, बिगर परवाना, स्वतःचे आर्थिक फायद्याकरिता कल्याण मटका नावाचा जुगार चालवत असताना मिळून आला असे अभियोग पक्षाने सिध्द केले नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.२ करीताः**

**१०.** वरील विवेचनावरुन हे स्पष्ट होते की, अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द दोष सिध्द केला नाही. म्हणून आरोपीची सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता करणे आवश्यक आहे. मुद्देमाल अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे, जप्त मुद्देमाल एक पांढरे रंगाचे स्लिपबुक, एक हिरवे रंगाचा बॉलपेन हे मुल्यहीन असल्याने सदर मुद्देमाल अपील कालावधीनंतर नाश करण्याचा पोलीसांना आदेश करणे योग्य व न्यायोचीत होईल. तसेच, जप्त मुद्देमाल रोख रक्कम रुपये १२१०/– ही अपील कालावधीनंतर सरकार जमा करणेबाबत पोलीसांना आदेश करणे योग्य व न्यायोचीत होईल. सबब, मी मुद्दा क्र.२ बाबत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी हिदायतुल्ला महमुद इनामदार, वय – ५० वर्षे, व्यवसाय – मजुरी, राहणार – न्यु कॉलनी, शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा. यांची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८ [फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २५५(१)] अन्वये मुंबई जुगार प्रतिबंध कायदा कलम १२(अ) च्या अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल एक पांढरे रंगाचे स्लिपबुक, एक हिरवे रंगाचा बॉलपेन

हे मुल्यहीन असल्याने सदर मुद्देमाल अपील कालावधीनंतर नाश करण्याचा पोलीसांना आदेश करण्यात येत आहे.

४. जप्त मुद्देमाल रोख रक्कम रुपये १२१०/– ही अपील कालावधीनंतर सरकार जमा करणेबाबत पोलीसांना आदेशीत करणेत येत आहे.

५. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ)] अन्वयेच्या तरतुदीनुसार वरिष्ठ न्यायालयात अपिलामध्ये किंवा न्यायनिर्णयाविरुध्द याचिकेमध्ये नोटीस मिळाल्यावर हजर राहण्याकरिता पुढील सहा महिन्यांपर्यंत कायम राहिल असे रुपये १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र दाखल करावे.

६. सदर न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी सो., सातारा यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३६५ अन्वये माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

PATTEBAHADUR KARUNA
Digitally signed by PATTEBAHADUR KARUNA
Date: 2025.04.24 14:24:24 +0530

दिनांकः २२.०४.२०२५ I/c. (श्रीमती क. अ. पट्टेबहादूर)
ठिकाणः खंडाळा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खंडाळा.